N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** नवापूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0393 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):29/06/2024 19:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From** (दिनांक पासून): 20/02/2024
   **Date To** ( दिनांक पर्यंत): 20/02/2024
   **Time From** (वेळेपासून): 16:13 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 18:04 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 29/06/2024 **Time** (वेळ): 18:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 012

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 29/06/2024 18:49 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
दक्षिण, 10 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): शेत सर्व्हे नं 95/1/अ , थुवा,नवापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): ईसाक जन गावीत

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | थुंवा,नवापुर,नवापुर,नवापूर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | थुंवा,नवापुर,नवापुर,नवापूर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सागर अशोक अहीरे | | | 1. 10,रुपाई नगर, पेरेजपुर, साक्री,,साक्री,साक्री ,धुळे, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

तक्रार यांचेकडुन

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
कॅम्पः- नवापुर पो.ठाणे
दि. 29/06/2024

माझे नाव ईसाक जॉन गावीत, वय-37 वर्षे, व्यवसाय-शेती, रा थुवा पो. गडद ता. नवापुर जि. नंदुरबार, मो.नं. 9664736337.

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी पत्नी हेमाबाई ईसाक गावीत, एक मुलगा ज्योतीन व मुलगी जयसंजन अशांसह एकत्र राहतो. तसेच शेती करून माझा व परिवाराचा उदरनिर्वाह करतो

माझी पत्नी हेमाबाई गावीत हिचे नावावर थुवा ता. नवापुर शिवारात शेत सर्व्हे नं. 18/1, 75/1/ब, 95/1/अ अशी सुमारे पाच एकर शेतजमीन आहे. सदर शेती हि कोरडवाहु असल्याने सदर शेतात मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजने अंतर्गत वैयक्तीक शेततळे मंजूर करणेसाठी कृषी विभाग नवापुर येथे मी सुमारे दिड वर्षापुर्वी तारीख आठवत नाही ऑनलाईन अर्ज केला होता, त्यानंतर ऑगस्ट-2023 मध्ये आमचे शेतात शेततळे बाधण्याची मंजुरी मिळाली आहे. आमचे वरील शेत सर्व्हे नं. 95/1/अ या शेतात शेततळे बांधण्याचे काम चालू आहे, परंतु शेततळे मंजुरी मिळालेल्या, ऑनलाईन काढलेल्या पुर्व संमती पत्रावर शेततळे हे शेत सर्व्हे नं. 18/1 या क्षेत्रात दिसते.

मी मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत वैयक्तीक शेततळे अनुदान मिळणेसाठी अर्ज केला असल्याने तालुका कृषी अधिकारी विभाग, नवापुर येथील कृषी अधिकारी सागर अहिरे साहेब हे माझे शेतात दि. 13/02/2024 रोजी आले होते, त्यावेळी मी नवापुर शहरात कामानिमित्त आलेलो होतो. परंतु आमचे शेतात माझे जेसीबीचा ड्रायव्हर श्री. गणेश कोकणी हा हजर होता. त्यावेळी कृषी अधिकारी अहिरे साहेब यांनी मला फोन करून सांगीतले होते की, आम्ही तुमचे शेतात येवुन पाहणी करीत आहोत, तुम्हाला शेततळे बांधण्यासाठी मशीनने ब्लास्टिंग करून घ्यावी लागेल. त्यावेळी मी त्यांना मोजमाप करण्यास सांगितले असता त्यांनी आम्ही आता मोजमाप करणार नाही नंतर करू, असे सांगुन शेततळयाचे मोजमाप केले नाही. म्हणून मी लगेच त्यांना भेटण्यासाठी नवापुर शहरातून शेतात जात असतांना कृषी अधिकारी अहिरे साहेब हे मला आमपाडा फाटयाजवळ भेटले, तेव्हा त्यांनी माझेकडुन आमचे शेतात शेततळयाचे बांधकामाचे मोजमाप करण्यासाठी तसेच सदरचे अनुदान मिळवुन देण्यासाठी 25,000/- रूपयांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना आता माझेकडे पैसे नाहीत असे सांगून नंतर पैसे आणून देतो, असे सांगितले होते. त्यानंतर माझे महत्त्वाचे काम चालू असल्याने मागील चार-पाच दिवस मी आपले कार्यालयातील पोलीस हवालदार पाटील दादा यांना संपर्क करू शकलो नाही, तरी तालुका कृषी विभागातील संबंधीत कृषी अधिकारी सागर अहिरे यांनी माझे शेतात येवुन मोजमाप करून ऑनलाईनला नोंद केली नाही, तर मला अनुदानाचे पैसे मिळणार नाहीत.

मला कृषी अधिकारी सागर अहिरे यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही, तसेच त्यांचेत व माझेत काहीएक खाजगी वाद-विवाद नसुन उधार उसनवारीचा व्यवहार नाही. तालुका कृषी विभाग, नवापुर येथील संबंधीत कृषी अधिकारी सागर अहिरे हे मागत असलेले 25,000/- रूपये हि मी चौकशी केली असता कोणतीही शासकिय फी नसुन ती लाचच आहे, अशी माझी खात्री झाल्याने नमुद बाबत मी अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयाचे पोलीस हवालदार पाटील दादा यांचेशी संपर्क करून माझे तक्रारीबाबत सविस्तर माहिती दिलेली होती, त्याअनुषंगाने त्यांनी माझेकडून माहिती घेवून त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचेषी बोलून मला तक्रार देणेकामी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नंदुरबार येथे बोलविले असता मी त्यांना नवापुर येथे येणेबाबत विनंती केल्याने दि.20/02/2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री.वाघ, अॅन्टी करप्शनचे पथक नवापुर येथे आले. त्यांनतर पोलीस निरीक्षक श्री. वाघ यांनी मा. मुख्याधिकारी, नगर परिषद, नवापुर यांना पंच मिळणेबाबत लेखी पत्र देवुन दोन पंचांना पाचारण केले, त्यानंतर मी दोन्ही पंचांसमक्ष माझी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री. समाधान वाघ साहेबांनी दिनांक 20/02/2024 रोजी माझे तक्रारीप्रमाणे पडताळणी करणेकामी अगोदर लोकसेवक कृषी अधिकारी सागर अहिरे हे कोठे आहेत? व मला भेटणेसाठी कोठे बोलवितात? याची खात्री करण्यासाठी माझे मोबाईल फोनवरून लोकसेवक कृषी अधिकारी सागर अहिरे यांचेषी संपर्क केला असता, त्यांचा फोन बिझी मिळुन आला होता. त्यानंतर थोडयावेळाने लोकसेवक कृषी अधिकारी सागर अहिरे यांचा मला फोन आला व त्यांनी मला शेततळयाजवळ जाण्यास सांगुन, ते व मावची साहेब मागुन येतो बाबत मोबाईलवर सांगीतल्याने, मला लोकसेवक कृशी अधिकारी सागर अहिरे यांची प्रत्यक्ष भेट घेण्यासाठी पंच नं. 1 श्री. राजरत्न पानपाटील यांचेसह माझे पत्नीचे नावे असलेले थुवा शीवारातील शेततळयाजवळ पाठविणेबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले होते.

त्यानंतर मला व पंच नं. 1 श्री. राजरत्न पानपाटील अषांना लोकसेवक कृषी अधिकारी सागर अहिरे हे लाच मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून देवुन माझे ताब्यातील बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटार सायकल क्र. एम.एच.39 के. 4237 हिचेने नवापुर गावाबाहेरील नवापुर-सुरत बायपास रोडवरील हॉटेल गार्डन येथुन माझे पत्नीचे नावे असलेले शेतात म्हणजेच नवापुर तालक्यातील थुवा शीवारातील शेततळयाजवळ रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं. 1 श्री. राजरत्न पानपाटील असे आमचे नवापुर तालक्यातील थुवा शीवारातील शेततळयाजवळ जावुन थांबलो. थोडयावेळाने पांढ-या रंगाची स्विफ्ट रंगाचे खाजगी वाहनातुन लोकसेवक कृषी अधिकारी सागर अहिरे व त्यांचे सोबत दोन इसम व त्यांचे मागोमाग काळया रंगांचे स्प्लेंडर मोटार सायकलने एक इसम माझा मित्र जान्या गावीत असे आमचे थुवा शीवारातील शेततळयाजवळ आले होते. त्यावेळी कृषी अधिकारी सागर अहिरे, लोकसेवक मावची साहेब यांचेशी माझे कामाबाबत चर्चा झाली होती. त्यानंतर कृषी अधिकारी सागर अहिरे यांनी माझे तक्रारीत नमुद प्रमाणे शेततळयाचे अनुदान मिळवुन देण्यासाठी 25,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 20,000/- रूपये लाचेची मागणी करून पैसे लागलीच देण्याचे सांगीतले, परंतु मी सागर अहिरे साहेबांना आता माझेकडे पैसे नाहीत, उदया सकाळी देतो असे सांगितल्याने, अहिरे साहेब यांनी 'उदया मी गडबडीत असल्याचे सांगितल्याने दि.22/02/2024 रोजी पुढिल सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले होते. तसेच कृषी अधिकारी सागर अहिरे यांनी माझेशी बोलतांना ''जिल्हयाचे वळवी यांना पाच हजार रूपये दयावे लागतील'' असे सांगीतले होते. परंतु लोकसेवक कृषी अधिकारी सागर अहिरे हे कोणासाठीही पैशांची मागणी करीत नसून ते स्वतः साठीच लाच मागणी करीत आहेत तसेच ते त्यांचे नावे खोटे सांगत असून कृषी अधिकारी सागर अहिरे यांनी त्यांचे स्वतः साठीच लाच मागणी केलेली आहे तसेच इतर दोघांची पडताळणी करण्याची आवश्यकता नसलेबाबत मी दोन्ही शासकीय पंचांना व पोलीस निरीक्षक श्री. वाघ यांना सांगितले होते.

त्यानंतर दि.21/02/2024 रोजी मला कृषी विभाग, नवापुर येथील श्री. अमित यांनी फोनकरून कृषी मंडळ अधिकारी श्री. अहिरे दि. 22/02/2024 रोजी बाहेर असल्याबाबत निरोप दिला होता. त्यानंतर दि. 23/02/2024 रोजी मी लोकसेवक श्री.अहिरे हे कार्यालयात येणार आहेत अगर कसे? बाबत माहिती घेतली असता, लोकसेवक अहिरे हे बाहेर गावी गेले असल्याचे कृषी कार्यालयातील सफाई कामगार यांच्याकडुन माहिती मिळाली होती. त्यानंतर दि.24/02/2024 (शनिवार) व दि.25/02/2024 (रविवार) रोजी अशा दोन दिवस शासकीय सुटी असल्याने, दि.26/02/2024 रोजी सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले होते.

दिनांक 26/02/2024 रोजी मी बोलविल्याप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री. वाघ व अॅन्टी करप्शनचे पथक असे सुरत बायपास रोडवरील हॉटेल गार्डनच्या बाजुस असलेल्या मोकळया जागेत आले. त्यावेळी मी व दोन्ही पंच असे हॉटेल गार्डनच्या बाजुस असलेल्या मोकळया जागेत हजर होतो. त्यानंतर कृषी अधिकारी श्री.सागर अहिरे हे त्यांचे कार्यालयात हजर आहेत अगर कसे? व मला भेटण्यासाठी कोठे बोलवितात? याची खात्री करण्यासाठी मी कृषी अधिकारी श्री.सागर अहिरे यांना संपर्क केला असता, कृषी अधिकारी श्री.सागर अहिरे यांनी मला 'अगोदर शेततळ्याची फिनीशींग करून फोटो पाठवा. नंतर मी शेतात येईल' असे सांगितल्याने सर्वानुमते सदरची कार्यवाही स्थगित करण्याचे ठरविण्यात आले होते. तसेच मी आपणास संपर्क करेल त्यावेळेस आपण पुढील सापळा कार्यवाहीसाठी यावे बाबत पोलीस निरीक्षक श्री. वाघ यांना सांगितले होते.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. वाघ यांनी मला वेळोवेळी संपर्क करून पुढील कार्यवाही केव्हा करायची बाबत विचारले होते, परंतु मी गुजरात जिल्हा परिषद, डांग अतर्गत आहवा पंचायत समिती मार्फत असणा-या शींगाणा, सुबिर, चिंचली, निशाना, जांबाला वैगरे ग्रामपंचायतीं अंतर्गत येणा-या गावातील रोडाचे तसेच जलजीवन मिशन योजने अंतर्गत पाण्याचे पाईप लाईनचे काम घेतले असल्याने मी त्या कामानिमित्त गुजरात राज्यात असल्याचे पोलीस निरीक्षक श्री. वाघ यांना सांगीतले होते, तसेच मला मंडळ कृशी अधिकारी श्री.सागर अहिरे साहेब यांनी पैषांसाठी फोन केल्यास मी आपणास कळवेल, बाबत पोलीस निरीक्षक श्री. वाघ यांना सांगुन, माझे पत्नीचे बँक खात्यात

पोलीस निरीक्षक नवापूर पोलीस ठाणे, जि. नंदुरबार

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

दिनांक 29/03/2024 रोजी आमचे शेतातील शेततळ्याचे अनुदानाची रक्कम रुपये 41,623/- रुपये जमा झाले आहे. परंतु तरी देखील मला मंडळ कृषी अधिकारी श्री. सागर अहिरे साहेब यांनी पैशांसाठी फोन केलेला नाही बाबत पोलीस निरीक्षक श्री. वाघ यांना सांगीतले होते. तसेच मी गुजरात राज्यातुन माझे काम पुर्ण झाले की, गावाकडे परत येईल त्या दिवशी मी आपणास संपर्क करेल, त्यावेळी आपण पुढील कार्यवाही करण्यासाठी यावे, बाबत पोलीस निरीक्षक श्री. वाघ यांना फोनव्दारे कळविले होते.

दिनांक 05/06/2024 रोजी मी पोलीस निरीक्षक श्री. वाघ यांना विनंती केल्याप्रमाणे दिनांक 06/06/2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री. वाघ व अॅन्टी करप्शनचे पथक असे नवापुर ते सुरत बायपास रोडवरील हॉटेल गार्डनच्या बाजुच्या मोकळया जागेत आले, त्यानंतर सर्वानुमते मी मंडळ कृषी अधिकारी श्री. अहिरे हे त्यांचे कार्यालयात हजर आहेत अगर कसे? व मला भेटण्यासाठी कोठे बोलवितात? याची खात्री करण्यासाठी त्यांना संपर्क करण्याचे ठरविले, त्यानुसार मी मंडळ कृषी अधिकारी श्री. अहिरे यांना फोन केला असता, मी मंडळ कृषी अधिकारी श्री. अहिरे यांना हिंदी भाषेत 'वो तलाव का पैसा आ गया था ऐसा' असे सांगीतले असता, मंडळ कृषी अधिकारी श्री. अहिरे यांनी 'तुमची सबसिडी जमा झाली आहे' असे मला सांगीतले. त्यानंतर मी त्यांना 'कधी भेटतात' असे विचारले असता, मंडळ कृषी अधिकारी श्री. सागर अहिरे यांनी मला 'ऑफीसला या' बाबत सांगीतल्याने, मला मंडळ कृषी अधिकारी श्री. अहिरे यांनी या अगोदर माझेकडुन मागणी केलेली लाचेची रक्कम 20,000/- रुपये त्यांना त्यांचे कार्यालयात देणेसाठी पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. वाघ यांनी मला मंडळ कृषी अधिकारी श्री. अहिरे यांना देणेसाठी लाचेची रक्कम हजर करण्यास सांगीतले असता, मी त्यांना 'आता माझेकडे पैसे नाहीत, मला ए.टी.एम.मधुन पैसे काढावे लागतील असे सांगीतल्याने, मला सर्वप्रथम ए.टी.एम. मधुन पैसे काढणेसाठी नवापुर शहरात पाठविण्याचे ठरविले व मी ए.टी.एम.मधुन पैसे काढुन आणल्यानंतर पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानंतर मी नवापूर गावातील बँक ऑफ महाराष्ट्राचे ए.टी.एम मध्ये गेलो असता, त्यादरम्यान मला मंडळ कृषी अधिकारी श्री. अहिरे यांनी फोन करून सांगीतले की, 'तुम्ही आता येवू नका, मला तुमच्याकडुन काहीच नको असे सांगीतले, तसेच शेळ नेट पॉली हाऊसची स्किम चालू आहे, तरी तुम्ही ऑनलाईन फॉर्म भरून हया योजनेचा फायदा करून घ्या, ती योजना मंजुर झालेनंतर त्याचे पुर्ण अनुदान काढून देईन.' असे सांगितले व फोन ठेवून दिला.

त्यानंतर मला पोलीस निरीक्षक श्री.वाघ यांनी पुढील कार्यवाही बाबत विचारणा केली असता, मी त्यांना सांगीतले की, माझे पत्नीचे नावावर असलेल्या शेतातील शेततळ्याचे अनुदानाची रक्कम माझे पत्नीचे बँक खात्यात दिनांक 29/03/2024 रोजी जमा झाली असुन, माझेकडुन लाचेची मागणी करणारे मंडळ कृषी अधिकारी श्री. सागर अहिरे हे त्यांनी मागणी केलेले 20,000/- रुपये आता माझ्याकडुन स्विकारणार नाहीत, व पुन्हा भविश्यात पैशांची मागणी देखील करणार नाहीत, अशी माझी पुर्णपणे खात्री झाली आहे.

तरी यातील श्री. सागर अशोक अहिरे वय 33 वर्षे, व्यवसाय-नोकरी, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, नवापुर, ता.नवापुर, जि.नंदुरबार, राहणार प्लॉट नंबर 10, रुपाई नगर, पेरेजपुर रोड, साक्री, ता. साक्री, जि. धुळे यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी माझेकडुन लाचेची मागणी केली म्हणून माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचून पाहिली असता ती माझे सांगीतल्याप्रमाणे लॅपटॉपवर टाईप करण्यात आलेली असून ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

हि फिर्याद दिली, सही,

दिनांक 29/06/2024

पोलीस ठाणे अंमलदार
नवापुर पोलीस स्टेशन

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Narendra Gopal Sable(I (Inspector)) / or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
नवापुर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Narendra Gopal Sab
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):